REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# झाडीपट्टीतील वास्तव जनजीवनाचा वेध घेणारी श्री. चुडाराम बल्हारपुरे यांची नाटके

श्री. जनबंधू तुळशिराम मेश्राम
सहयोगी प्राध्यापक,सर्वोदय महाविद्यालय सिंदेवाही, जि. चंद्रपूर.

## प्रस्तावना :

'रंगभूमी' हा शब्द कानावर पडला की, आपल्या नजरेसमोर उभी राहते ती पुण्या—मुंबईची मराठी रंगभूमी. परंतु थोडा सखोल विचार केला तर आपल्या लक्षात येईल की या रंगभूमीएवढीच समृद्ध आणि तेवढ्याच तोलामोलाची रंगभूमी पूर्व विदर्भाच्या भूमीवर गेल्या एका शतकापासून वावरते आहे. ती रंगभूमी म्हणजे 'झाडीपट्टी रंगभूमी' होय. ही रंगभूमी केवळ लोकांचे मनोरंजन करण्याचे साधन नाही; तर लोक प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम आहे.

झाडीपट्टीतील मुख्य पीक धानाचे आहे. धान शेतीचा हंगाम साधारणत: मे—जून पासून सुरु होतो तो दसरा—दिवाळी पर्यंत चालतो. ऊन, पाऊस, वादळवाऱ्याची पर्वा न करता शेतीत राबणारा येथील शेतकरी आणि शेतमजूर दसरा दिवाळीत शेतात डोलू लागलेले धानाचे पीक पाहून आनंदित होतो. शेतीच्या कामातून उसंत मिळाल्यानंतर येथे गावागावात सुरु होते मंडई, जत्रा, कुठे कार्तिकोत्सव तर कुठे भागवत सप्ताह. या ऑक्टोबर ते मार्च ह्या सहा महिण्याच्या काळात गावागावात मंडई किंवा शेतकरी मेळावे भरवून रात्री मनोरंजनासाठी नाटके सादर केली जातात.

झाडीपट्टी रंगभूमीच्या प्रारंभिक काळात येथे पुण्या—मुंबईकडील लेखकांची धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक नाटके सादर होत होती. नंतर विनोदी आणि लावणीप्रधान नाटके सादर होऊ लागली. परंतु बदलत्या काळात झाडीपट्टीतील काही सुशिक्षित व्यक्तिंना वाटू लागले की, या नाटकातून व्यक्त होणाऱ्या समस्या आपल्या नाहीत. आपल्या समस्या वेगळ्या आहेत. आपल्या समस्या, आपले प्रश्न, आपले जीवनवास्तव आपणच समाजापुढे मांडले पाहिजे ह्या विचाराने हातात लेखनी घेतली आणि झाडीपट्टीत नाट्यलेखनास सुरुवात झाली.

## झाडीपट्टीतील लेखकांचे नाट्यलेखन :

गडचिरोली येथील श्री. गो. ना. मुनघाटे गुरुजी यांनी १९६० साली 'खेड्यातील माणसं' हे नाटक लिहून झाडीपट्टीत नाट्यलेखनाची मुहूर्तमेढ रोवली खरी; परंतु म्हणावी तशी नाटके या काळात झाडीपट्टीत तयार झाली नाहीत. त्याकरिता पुन्हा दोन दशके वाट पहावी लागली. १९८० नंतर झाडीपट्टीत नाट्यलेखनाला गती प्राप्त झाली. नागभिडचे मनोहर पोलकमवार, रेंगेपार (कोहळी) चे डॉ. हरिश्चंद्र बोरकर, पालांदूरचे न. सी. खंडाईत, आमगावचे पांडुरंग भेलावे, खंडाळ्याचे स. रा. मस्के, साकोलीचे बा. ल. मेश्राम, कुरखेड्याचे विठ्ठल पाकलवार, आरमोरीचे गा. रा. वडपल्लीवार गुरुजी, राजोलीचे दिनेश ठिकरे, नवरगावचे प्रा. सदानंद बोरकर, गडबोरीचे दिलीपकुमार वढे, सिंदेवाहीचे प्रेमकुमार खोब्रागडे, सुप्रसिद्ध गायक अनिरुद्ध वनकर, सिद्धार्थ गोवर्धन, यश निकोडे, आनंद भिमटे, संजय ठवरे इत्यादी लेखकांनी नाट्यलेखन करुन



झाडीपट्टी रंगभूमी समृद्ध केली. ह्या नाटककारांपैकी गडचिरोलीचे श्री चुडाराम बल्हारपुरे यांनी झाडीपट्टीतील जनजीवनाचा वेध घेणारी नाटके लिहून त्यांचे सादरीकरण करुन ती प्रकाशितही केली आहेत. 'बहुरंगी समाधीवाले बाबा', 'कहाणी माझ्या संसाराची', 'दगाबाज', 'डाव तिमीराचा', 'अमृत मी राहिले', 'स्पेशल रिपोर्ट', आणि 'महामृत्युजंय मार्कंडेश्वर' ही नाटके लिहून प्रकाशितही केली आहेत. ह्या नाटकांपैकी 'बहुढंगी समाधीवाले बाबा' आणि 'स्पेशल रिपोर्ट' ह्या नाटकात त्यांनी झाडीपट्टीतील वास्तव जनजीवनाचे चित्रण केले आहे.

## १. बहुढंगी समाधीवाले बाबा :

झाडीपट्टीतील लोकांच्या मनात घर करुन बसलेली अंधश्रद्धा व बुवाबाजी आणि त्यातून घडलेली एका दलित तरुणाची हत्या या सत्यघटनेवर आधारित हे नाटक आहे. झाडीपट्टीत १९८२ मध्ये 'वडधा—आरमोरी' परिसरात माणुसकीला काळीमा फासणारे एक हत्याकांड घडले होते. या हत्याकांडाच्या सत्यघटनेवर श्री. चुडाराम बल्हारपुरे यांनी या कल्पिक नाटकाची रचना केली आहे. हे नाटक त्यांनी झपाटल्यागत फक्त एका महिण्यात श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी दि. १२ ऑगस्ट १९८२ ला लिहून पूर्ण केले. आपल्या या नाटकाबद्दल स्वत: त्यांनीच सांगितले आहे की, ''अखील झाडीपट्टीकरीता 'समाधीवाले बाबा' एक वादळ ठरलं, हे 'वादळ' आज आपल्यापर्यंत पुस्तकरुपाने येत आहे. ह्यापासून आपण दूर न पळता जवळ येऊन त्याला मायेनं जवळ घेऊन गोंजारण्याचा प्रयत्न केला तर निश्चितच तुम्हाला इथे सापडेल दलितांचा दर्द, प्रेमिकांची प्रिती, भारतीय संस्कृतीचा झालेला शिरच्छेद आणि समाज विघातकांचा घातकीपणा बरंच काही मिळेल''[१]. १९८७ मध्ये त्रिदल प्रकाशन, मुंबई या प्रकाशनाद्वारे हे नाटक प्रकाशित झाले.

'बहुढंगी समाधीवाले बाबा' ह्या नाटकाचा आरंभ नाटककाराने फ्लॅशबॅक पद्धतीने केला आहे. नाटकात सर्वात शेवटी घडणारी घटना दाखवून त्याद्वारा नाटककाराने नाट्यबीज तर उघड केलेच परंतु प्रेक्षकांच्या मनात नाटकाबद्दलची जिज्ञासाही निर्माण केली आहे. ह्या नाटकाच्या पहिल्या अंकातील पहिल्या प्रवेशात पोलीस स्टेशनचे दृश्य दाखविले आहे. डी. वाय. एस. पी. व इन्सपेक्टर बसलेले आहेत. त्यांच्या समोर टेबलावर फॉईल्स ठेवलेल्या आहेत. एका बाजुला हातकडी घालून समाधीवाले बाबा व त्याच्या दोन बाजूला दोन पोलीस उभे आहेत. काही पोलीस फाइल्स नेणे—आणणे वैगरे धावपळ करतांना दिसतात. इन्सपेक्टर अपराधी मुद्रेने खाली मान घालून बसलेले दिसतात. टेबलाच्या दुसऱ्या बाजूला काही पत्रकार बसलेले आहेत. बाहेर लोकांचा कोलाहल आणि 'समाधीवाले बाबा मुर्दाबाद!' अशा घोषणा ऐकू येतात. त्याचवेळी इन्सपेक्टर काही कागदांची फाईल डी. वाय. एस. पी. कडे देतात. डी. वाय. एस. पी. फाईल चाळतात व उठून उभे होऊन बोलतात. मित्र हो, आज मी एका फार मोठ्या प्रकरणावर प्रकाश टाकणार आहे. हे प्रकरण खरोखरच माणुसकीला काळीमा लावणारे आहे. आजचा माणूस किती निच वर्तन करु शकतो? प्रेमवीर प्रितीकरिता मृत्यूस कसा कवटाळतो? साधुगिरीचे नावाखाली भोंदुगिरी कशी चालते हे मी आपणास सांगणार आहे. हा जो इथे दिसतो ह्याचं नाव आहे 'समाधीवाले बाबा' हा माणूस; माणूस नसून माणसाच्या नावाखाली वावरणारा एक सैतान आहे... हा साधुगिरीचे नावाखाली एक कलंक होता. मोठमोठ श्रीमंत लोक, व्यापारी, पुढारी, राजकीय कार्यकर्ते याचे भक्त होते. एवढेच नव्हे तर येथील कायद्याचे संरक्षक देखील ह्याच्या ढोंगीपणाला फसून ह्याचे भक्त झाले होते आणि एवढे मोठे प्रकरण घडून गेल्यावर देखील ते मूग गिळून गप्प बसले होते...'[२] यावरुन अंधश्रद्धा आणि बुवाबाजी येथील माणसांच्या मनीमानसी किती मुरलेली होती याचे दर्शन होते.

कायद्याचे रक्षण करणाऱ्यांविषयी लोकांच्या मनात प्रचंड गैरसमज निर्माण झाला आहे, ही वस्तुस्थिती स्पष्ट करताना डि. वाय. एस. पी. म्हणतो ''आम्हा कायद्याच्या संरक्षकांविषयी लोकांच्या मनात गैरसमज निर्माण झालेला आहे. विशेषत: ह्या समाधीवाले बाबा सारख्यांना वाटतं की पोलीस आपल्या खिशात आहेत. ते आपलं काहीही वाकडं करु शकत नाहीत. हा समज मात्र चुकीचा आहे''[३] असे सांगत पोलीसांना आपल्या कर्तव्याची जाणीव करुन देतांना म्हणतो की, ''पोलीस हा कायद्याचा पर्यायाने कायदा

हा मानवाकरीता असल्यामुळे मानवाचा संरक्षक आहे. कुणाच्या दारावरील फेकलेल्या भाकरीचा तुकडा लाचारीने उचलून चघळणारा कुत्रा नाही.''[४] यावरुन डि. वाय. एस. पी. च्या आपल्या कर्तव्यप्रती असलेली प्रामाणिकता आणि कर्तव्यदक्षता स्पष्ट होते. डि. वाय. एस. पी. ह्या कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्यांचे चित्रणही नाटककराने मोठ्या खुबीने केले आहे.

'बहुढंगी समाधीवाले बाबा' हे नाटक ग्रामीण भागात घडलेल्या एका प्रेमकथेवर आधारलेले आहे, दलित समाजातील तरुण— धुरीन आणि मुसलमान समाजातील तरुणी—शहजादी यांची प्रेमकथा व या प्रेमकथेचा शेवट म्हणजे हे नाटक. प्रेमाला जात नसते. प्रेम जात—पात, धर्म, वर्ण काही पाहत नाही असे बोलले जाते, पण ते कथा, कादंबरी, नाटकांपुरतेच मर्यादित असते. प्रत्यक्ष वास्तव जीवनात त्याचा उलट प्रत्यय येतो. जातीची पाळंमुळं किती खोलवर रुजली आहेत, याचा प्रत्यय या नाटकातील एकमेकावर जीवापाड प्रेम करणाऱ्या 'दलित नायकाला' ही येतो. त्याचा आतला आवाज त्याला सांगतो, ''जर मुसलमानांना तुमचं प्रेमप्रकरण कळलं तर मुसलमान पेटून उठेल. मुसलमान पेटला नि दलित चिडला तर संघर्षाची ठिणगी उडल्यावाचून राहणार नाही. 'जात' माणसाला नष्ट केल्यावाचून राहणार नाही.''[५]

प्रेम करणारे प्रेमवीर आंधळेपणाने प्रेम करीत असले तरी समाजाचे डोळे मात्र त्यांच्याकडे असतात. कधी ना कधी प्रेम उघड हातेच. धुरीन आणि शहजादी यांच्या प्रेम प्रकरणाची कुणकुण शहजादीच्या वडिलांना लागते. त्यांचा या प्रेमाला विरोध असतो. आपल्या मुलीला वजायत मियॉं समजावून सांगतात, ''बेटी, तो दलित का लौंडा बडा जालीम है। माझ्या भोळ्या भाबड्या शहजादीला त्याने अशा प्रकारे आपल्या जाळ्यात ओढलंय. बेटी, त्याच्यावर कवडीचाही विश्वास ठेवणं मुर्खपणाचं आहे.''[६]

पण हट्टाला पेटलेली शहजादी त्यांचे ऐकत नाही. मोठ्या प्रयासाने शहजादीचे मन वळविण्यात वजायत मियॉं यशस्वी होतात. धुरीन पासून तिला अलग करण्याकरिता समाधीवाले बाबाच्या आश्रमात तिच्यावर इलाज करण्यासाठी ठेवतात. वजायत मियॉंना वाटते की, समाधीवाले बाबांच्या सहवासात शहजादी धुरीनला सहज विसरेल. पण घडते मात्र अगदी उलट. शहजादी धुरीनला विसरते पण समाधीवाले बांबाच्या पाशवी प्रेमात मात्र ती आकंठ बुडते.

शहजादीवर जीवापाड प्रेम करणारा धुरीन आपल्या प्रेमिकेचा शोध घेत बाबांच्या आश्रमात येतो. आपल्या प्रेमातील काटा बनून राहिलेल्या धुरीनला संपविण्याची आयतीच संधी समाधीवाले बाबाला चालून येते. तो धुरीनचा गळा दाबून मर्डर करतो व त्याचे प्रेम आपल्या आसनाखालीच पुरुन त्यावर बसत असतो. एवढे मोठे प्रकरण घडूनही इन्सपेक्टर समाधीवाले बाबांचे भक्त असल्यामुळे थंड बस्त्यात पडलेले आहे. पण काही दलित लोक ह्या प्रकरणाची तक्रार डि. वाय. एस. पी. कडे करतात. आणि समाधीवाले बाबांचे भक्त असल्यामुळे थंड बस्त्यात पडलेले आहे. पण काही दलित लोक ह्या प्रकरणाची तक्रार डि. वाय. एस. पी. कडे करतात. कर्तव्यदक्ष डी. वाय. एस. पी. ह्या हत्याकांडाचा तपास करतात आणि समाधीवाले बाबांना व त्याच्या सहकाऱ्यांना शिक्षा सुनावतात.

श्री. चुडाराम बल्हारपुरे हे समाज जीवनातील दु:खीतांच्या दु:खाने कळवळणारे नाटककार आहे. लोकांच्या व्यथा वेदनांना, अन्याय अत्याचारांना न्याय मिळावा या करिता ते तळमळतात. ही त्यांची तळमळ त्यांच्या 'समाधीवाले बाबा' ह्या नाटकाच्या अर्पण पत्रिकेतून दिसून येते. ते लिहितात, ''ह्या नाटकातील नायक जो अचानक काळाच्या कराल दाढेत लोटला जाऊन आता केवळ एक 'कहाणी' बनलेला आहे, त्यांच्या पवित्र स्मृतीस ह्या कल्पित नाटकाच्या मूळ सत्यकथेच्या त्या सर्व व्यक्तिंना जे ह्या कथेत जाणते—अजाणतेपणी गोवले गेले आणि जी एक 'कथा' बनून राहिले. कायद्याच्या त्या सर्व संरक्षकास ज्यांनी हे प्रकरण जीव तोडून फोडून काढले. आमच्या त्या सर्व दलित बांधवांस ज्यांनी एका गरीब मातेच्या 'टोहास' धावत येऊन जातीने हे प्रकरण उघडकीस आणले आणि माझ्या आई व वडील यांच्या पवित्र चरणी सदर कलाकृती सविनय अर्पण—''[७] यातून नाटककाराची दलितांविषयी असलेली अपार करुणा, कायद्यांवरील विश्वास आणि आई वडिलांवरील अपार श्रद्धा दिसून येते.

## २. 'स्पेशल रिपोर्ट'

हे श्री. चुडाराम बल्हारपुरे यांनी लिहिलेले नावाप्रमाणेच स्पेशल नाटक आहे.१९९७ मध्ये 'अर्थदर्शी थियटर, नागपूर' द्वारा आयोजित नाट्यलेखन स्पर्धेत ह्या नाटकाला नाट्य लेखनाचा 'द्वितीय क्रमांक' प्राप्त झाला आहे. या नाटकाचा प्रथम प्रयोग दिनांक २ मे १९८६ रोज शुक्रवारला रात्रौ ९.०० वाजता आरमोरी जि. गडचिरोली येथे सादर करण्यात आला; तर व्यावसायिक रंगभूमीवर याच नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग 'प्रतिभा थियेटर्स, मुंबई या संस्थेद्वारा शिवाजी रंगमंदिर, दादर, मुंबई येथे दिनांक २२ फेब्रुवारी १९९३ रोज सोमवारला रात्रौ ८.०० वाजता सादर करण्यात आला. झाडीपट्टीतून मुंबईच्या व्यावसायिक रंगभूमीवर गेलेले 'स्पेशल रिपोर्ट' हे झाडीपट्टीतील नाटककाराचे पहिले नाटक आहे. ज्या काळात झाडीपट्टी रंगभूमीवरील मुंबईच्या लेखकांची नाटके सादर होत होती, त्याच काळात झाडीपट्टीतील श्री. चुडाराम बल्हारपुरे यांचे नाटक मुंबईच्या रंगभूमीवर सादर होत होते. सुयोग प्रकाशन, वर्धा येथे दि. १४ नोव्हेंबर २००० ला हे नाटक प्रकाशित करण्यात आले.

नऊ पुरुषपात्रे आणि दोन स्त्री पात्रे असलेल्या ह्या नाटकात झाडीपट्टी परिसरात पंचायत समिती कार्यालयात घडलेल्या एका सत्य घटनेचे चित्रण केले आहे. बाई आणि बाटली ह्यांनी नासलेले राजकारण शहरापासून गाव–खेड्यापर्यंत सर्वच मानवी जीवनाची कशी नासाडी करते हे नाटककाराने ह्या नाटकात प्रखरपणे रंगविले आहे.

ह्या नाटकातील प्रमुख व्यक्तिरेखा असलेले बारादेव भूते व त्याची पत्नी सौ. भुते सुखी संसाराचे चित्र रंगवितात. 'एकच लेकरु हाय आपलं, त्याला आपण खूप शिकवायचं, खूप मोठं करायचं, बडे बाबू बनवायचं' ही गरीब चौकीदार बारादेव भूतेची मनिषा तर 'एकच लेकरु हाय आपलं त्याला आपण खूप शिकवायचं. खूप मोठं करायचं. बडे बाबु बनवायचं, ही गरीब चौकीदार बारादेव भूतेची मनिषा तर ' एकच लेकरु हाय आपलं. आपल्या गरिबीला परवडत न्हाय, म्हणून आपण दुसरं लेकरू होवू दिलं न्हाय. देवाची किरपा झाली तर समदी सपनं पुरी होतील बघा आपली' हे बारादेव भूतेच्या पत्नीचे भविष्यातील स्वप्न... पण 'आपण खूप गरीब हाय. गरिबाला मोठी सपनं बघायचा अधिकारी नसतो राणी' हे गरिब चौकीदार बारादेव भूते याच्या जीवनातील वास्तव 'स्पेशल रिपोर्ट' ह्या नाटकात नाटकाराने रंगविलेले आहे.

बारादेव भूते सारखा एक गरीब, निरुपद्रवी माणूस सरकारी ऑफिसमधील सभापती आणि जी.डी. एम. बाईचा एक प्रसंग स्वतःच्या डोळ्यांनी पाहतो. त्याने पाहिलेल्या प्रसंगाची कुठेही वाच्यता होऊ नये म्हणुन 'न रहेगा बास, न बजेगी बासरी' या उद्देशाने सभापती व जी.डी.एम. बाई पोलीसांच्या मदतीने त्याचा कसा खून पाडतात आणि बारादेव भूत बनून आल्यावर त्यांना कसा छळतो हे मोठ्या कौशल्याने नाटककाराने ह्या नाटकांत मांडले आहे. या सोबतच 'ह्ये जगच असं हाय बघा. दिल्या घेतल्या बिगर काय बी होत न्हाय इथं.' ही सरकारी कार्यालयातील कामाची रीत, 'सरकारी नोकरांना अधनंमधनं सायबाच्या घरच पण काम करावं लागतं. मोठी माणसं हायत. विच्छा नसली तरी पण करावं लागतं काम. नोकरी टिकवायची म्हणजे समदं करावं लागतं. आतलं, बाहेरचं!' लहान कर्मचाऱ्याचे हे कामाचे ओझे, तर 'असे अनेक मुखवटे घालून इथे वावरावं लागतं मला! मनाला न पटणारे, तरिही पटवून घ्यायला लावणारे', ही सरकारी अधिकारी वर्गाची व्यथा नाटककाराने ह्या नाटकात सांगितली आहे.

जी. डी. एम. बाईच्या ऑफिसमधील बारादेव भूते हा चौकीदार माणूस, दारुच्या आहारी गेलेला पण ''यापुढं दारुच्या थेंबालाही शिवणार न्हाय राणी. अगदी तुझ्या गळ्याची शपथ.''[८] अशी शपथ घेतो. आपण बरे की आपले काम बरे असे प्रामाणिकपणे आपले कर्तव्य करतो. बारादेवांचा भगत आणि भूतांचा सेवक असूनही भूते सरकारी कारस्थानात मरतो. त्याची बायको त्याच्या प्राणाची भीक मागत अनेकांचे उंबरठे झिजवते. आपल्या नवऱ्याच्या मरणाला कारण असलेल्या जी. डी. एम. बाईकडे जावून तिला आपली व्यथा सांगून न्यायाची भीक मागते. पण ''हे बघ तुझं दुःख जाणते मी. झालं ते फार वाईट झालं. असं व्हायला नको होतं. पण तू काही काळजी करु नको. मी जरुर ती सर्व मदत मिळवून देईन तुला... तुला काही कमी पडणार नाही यापुढे.''[९] असे आश्वासन देऊन जी. डी. एम. बाई तिची भलावण करते.

स्वाभिमानाने जीवन जगणाऱ्या सौ. भूतेला हे सर्व नको असते. तिला हवा असतो फक्त तिचा नवरा. म्हणूनच सौ. भूते जी. डी. एम. बाईची ''ह्ये बघा बाई, यातलं काही नकोय मला. एक करा बाई.

मला फकस्त माझा नवरा आणून द्या. द्याल तुम्ही? बाई, नवऱ्याशिवाय जगता येतं तुम्हा शिकल्या सवरल्या बायांना. गळ्यातलं मणी मंगळसूत्र हौस म्हणून मिरवता येतं तुम्हास्नी. नवरा असला काय अन् नसला काय, तुम्हास्नी सारखचं''[१०] अशी बाणेदारपणे कान उघडणी करते. जी. डी. एम. बाईला सौ. भूतेचा भयंकर राग येतो आणि तिच्या अंगावर जात रागाने म्हणते, ''यू फूल ब्लडी रास्कल! शट युवर माऊथ ॲन्ड गेट आऊट फ्रॉम हाऊस.''[११] असे म्हणून तिला जायला सांगते. सौ. भूते तिला घाबरत नाही. उलट '' आगं सटवे, माझ्या भरल्या सौंसारात आमचा कायबी गुन्हा नसताना माती कालवलीस पण तुला एकच सांगते. गरिबाच्या शिव्याशापाला देवाची दया पण वाचविणार न्हाय. मी एक निराधार, विधवा, एका लहान लेकराची आय. माझे तळतळात तुला सुखाने जगू बी देणार न्हाईत अन् मरुबी''[१२] असा शाप देऊन ताड्ताड् निघून जाते. नाटककाराने सौ. भूतेच्या या संवादातून तिच्या अंत:करणातील तळतळाट मोठ्या कुशलतेने व्यक्त केला आहे.

बारादेव भूतेच्या खूनाचा तपास करण्याचे काम इन्व्हेस्टिगेशन ऑफिसर राजेश देशपांडे या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याकडे सोपविले जाते. जी. डी. एम. बाई आणि सभापती गमजे यांनीच आपले अनैतिक संबंधाचे रहस्य उघडकीस येवू नये म्हणून बारादेव भूतेला ठार मारले असा निष्कर्ष चौकशी अधिकारी पुराव्यासह काढतात आणि या प्रकरणातील आरोपींना शिक्षा ठोठावतात.

## नाटककाराची भाषाशैली :

झाडीपट्टी बऱ्याच नाटककारांनी आपल्या नाट्यलेखनात 'झाडीबोलीचा' वापर केलेला दिसतो, परंतु श्री. चुडाराम बल्हारपुरे हे जन्माने झाडीपट्टीतील असूनही त्यांनी आपल्या नाट्यलेखनात झाडीबोलीचा वापर केलेला नाही. 'बहुढंगी समाधीवाले बाबा' या नाटकातील संवाद लेखनाकरिता त्यांनी प्रमाण मराठी, उर्दू व हिंदी या तीन भाषांचा वापर केला आहे. त्यांची भाषाशैली सहज सोपी आणि अर्थप्रवाही आहे. 'समाधीवाले बाबा' ह्या नाटकातील 'बजायत मियॉ ऊर्फ अब्बाजान' ह्या पात्रासाठी उर्दू मिश्रीत हिंदी भाषा, 'समाधीवाले बाबा' आणि 'मुन्नीबाई' या पात्रांसाठी हिंदी व मराठी भाषा, 'शहजादी' या पात्राकरीता मराठी व क्वचित हिंदी भाषा आणि इतर पात्रासाठी प्रमाण मराठी भाषेचा वापर केला आहे. त्यामुळेच पात्रांच्या व्यक्तिमत्वाची सहजता व नैसर्गिकता स्वाभाविकपणे जपण्यात नाटककार यशस्वी झाले आहेत.

'स्पेशल रिपोर्ट' ह्या नाटकात सुद्धा त्यांनी प्रमाण मराठी, गावरान मराठी, हिंदी, इंग्रजी उर्मट हिंदी भाषेचा वापर केला आहे. बारादेव भूते आणि त्याची पत्नी सौ. भूते या पात्रांच्या मुखी गावरान मराठी भाषा, कार्यालयातील क्लर्क कांबळे आणि शेख या पात्रांच्या तोंडी मराठी आणि हिंदी भाषा, सभापती आणि जी. डी. एम. बाई या पात्रांच्या मुखी मराठी आणि इंग्रजी भाषा आणि इन्सपेक्टर बेग या पात्रासाठी उर्मट हिंदी भाषेचा वापर केला आहे.

शुभाषितवजा भाषा हे नाटककारांच्या भाषाशैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य जाणवते. उदा. 'शराब छोडने की कसम शराबी लोग अक्सर शराब पीने परही लेतेही है।', 'मान मागून मिळत नसतो, तो मिळवावा लागतो.', 'जखमेवर वेळीच उपचार केलेत तर ती जखम चिघळत नाही.', 'इज्जत कमवायला बराच कालावधी जातो, पण इज्जत गगमवायला एक क्षणही पुरेसा असतो.' अशी कितीतरी शुभाषितांसारखी वाक्य संपूर्ण नाटकभर दिसून येतात.

## परिणामकारकता :

'बहुढंगी समाधीवाले बाबा' ह्या नाटकातून नाटककाराने साधुगिरीच्या नावाखाली चाललेली भोंदूगिरी उघड केली आहे. तर 'स्पेशल रिपोर्ट' ह्या नाटकातून सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणला आहे. असे अनेक रिपोर्ट असतील पण त्यांची दखल घेणारे कर्तव्यदक्ष अधिकारी न मिळाल्यामुळे ते केराच्या टोपलीत धूळ खात पडले असतील. कारण मोठे मोठे अधिकारी सुद्धा राजकारण्यांच्या दबावाला बळी पडतात, मग क्लर्कसारख्या लहान कर्मचाऱ्यांची काय कथा? पण ह्या नाटकात मात्र क्लर्कच कार्यालयातील फार मोठ्या भ्रष्टाचाराची 'स्पेशल रिपोर्ट' वरिष्ठांपर्यंत करुन हे प्रकरण उजेडात आणतात.

'बहुढंगी समाधीवाले बाबा' ह्या नाटकातही दलित लोक समाधीवाले बाबाची रिपोर्ट करुन त्याने केलेल्या खुनाचा भंडाफोड करतात.

श्री. चुडाराम बल्हारपुरे ह्यांनी आपल्या दोन्ही नाटकात केलेले प्रभावी व्यक्तिचित्रण, नाटकाची वातावरण निर्मिती, प्रभावी संवादरचना, सूचकतेने केलेल्या नेपथ्याचा वापर, प्रेक्षकांना चटका लावणारे पण अंतमुर्ख करणारे प्रसंग, ह्यामुळे ही दोन्ही नाटके फारच प्रभावी व परिणामकारक ठरली आहेत.

## संदर्भसूची :

१. चुडाराम बल्हारपुरे. 'बहुढंगी समाधीवाले बाबा'; त्रिदल प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८७ (मनोगत)
२. उनि. पृ. ८
३. तत्रैव. पृ. ८
४. तत्रैव. पृ. ९
५. तत्रैव. पृ. १६
६. तत्रैव. पृ. २६
७. तत्रैव. अर्पणपत्रिकेमधून
८. चुडाराम बल्हारपुरे, 'स्पेशल रिपोर्ट', सुयोग प्रकाशन, वर्धा, प्रथम आवृत्ती, २०००, पृ. २
९. उनि. पृ. ५८
१०.तत्रैव. पृ. ५९
११.तत्रैव. पृ. ६१
१२.तत्रैव. पृ. ६१

LBP PUBLICATION